# राज्याचा खरीप हंगाम २०२०-२० हवामान, अंतिम पीक पेरणी व पीक परिस्थितीचा अहवाल दि.१९-१०-२०२० अखेर

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश विभागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

कोंकण, पुणे, कोल्हापूर व लातूर विभागात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर औरंगाबाद विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि.१ जून ते १९ ऑक्टोंबर कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस १०४७.८ मि.मी. असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० पर्यंत ११९६.७ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११४.२१ टक्के पाऊस झाला. मागील वर्षी दि.१९.१०.२०१९ अखेर १२४८ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ११९.११ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि.१ जून ते १९ ऑक्टोंबर, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | १ | नंदुरबार |
| ४ | ७५ ते १०० % | ८ | रायगड, नाशिक, कोल्हापूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | २५ | ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, वाशिम, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली. |

राज्यात दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी १ तालूक्यांत २५ ते ५० %, १७ तालूक्यात ५० ते ७५ %, ७२ तालूक्यात ७५ ते १००% तर २६५ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, भात पिकावर निळे भुंगेरे, पिवळी खोडकिड, तुडतुडे व गादमाशी या किडींचा तर करपा व कडा करपा या रोगांचा, कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर घाटे अळीचा व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

दि.१६.१०.२०२० अखेरच्या माहे, ऑक्टोंबर, २०२० मधील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राच्या प्राथमिक अहवालानुसार २६ जिल्हयातील ८९५०७४ हे. क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये भात, सोयाबीन, कापूस, ऊस, मका,उडीद, केळी, भाजीपाला इ. पिकांचा समावेश आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९८ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर १४५.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.४६%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून १४७.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.५६%) पेरणी/लागवड झाली आहे. मागील वर्षी दि.०४.११.२०१९ रोजी संपणाऱ्या सप्ताहाअखेर राज्यातील ऊस पिकासह पेरणी क्षेत्र १४२.६२ लाख हे. (९४.२४%) तर ऊस पिक वगळून पेरणी क्षेत्र १४१.३९ लाख हे. (९९.५८%) होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात गरवा व निम गरवा भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत असून, हळवा भात काढणीचे काम सुरु आहे. नाचणी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. बाजरी पिक पक्वतेच्या अवस्थेत असून काढणी प्रगतीपथावर आहे. मूग व उडिद पिकांच्या काढणीची व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहे. सोयाबीन व भुईमूग पिके पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. कापूस पिक बोंडे लागणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणी सुरु आहे. ज्वारी पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु झाली आहेत. सुर्यफुल पिक दाणे भरणेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. मका कणसे लागणे, दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. तूर पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे.

**खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी (दि.१९.१०.२०२० अखेर)**



## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता




## खरीप हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (ऊस पिकासह) (क्षेत्र लाख हे.)




## रब्बी हंगाम-२०२०-२१

रब्बी हंगामात काही विभागात ज्वारी, हरभरा व मका पिकांची पेरणीची कामे सुरु झाली असून, इतर पिकांसाठी पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत. पुणे व कोल्हापूर विभागात अनुक्रमे १४९२१० हे. व ५०९२७ हे. क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झालेली आहे.

# विभागनिहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर ४.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१.५८%) पेरणी झाली आहे. विभागात हळवे व निम गरवे भात पिक दाणे भरणेच्या ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. गरवे भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. काही ठिकाणी पक्व झालेल्या भात पिकाचे कापणीस सुरुवात झाली आहे. नाचणी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. कडधान्ये व तेलबिया पिके फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड या किडीचा प्रादुर्भाव आढळून आला. किड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

## नाशिक विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर २०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.३४%) पेरणी झाली आहे. विभागात गरवा व निम गरवा भात पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत असून, हळवा भात काढणीचे काम सुरु आहे. नागली पिक फुलोरा ते दाणे लागणेच्या अवस्थेत आहे. मका पिक दाणे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक काढणीच्या अवस्थेत असून सखल भागामध्ये पाणी साचल्यामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. मूग व उडीद पिके काढणीची कामे पुर्ण होत आली असून, सततच्या पावसामुळे पिकास नुकसान झाले आहे. भुईमूग पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत. कापूस बोंडे भरणेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी वेचणी सुरु आहे. ज्वारी पिक काढणीची कामे सुरु आहेत. सुर्यफुल व कारळा पिके फुलोरा अवस्थेत आहेत. बाजरी पिक काढणी अंतिम टप्प्यात आहे. तीळ पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## पुणे विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर १२.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१४४.५५%) पेरणी झाली आहे. विभागात मुग व उडीद पिकाची काढणीची कामे पुर्ण झाली असून, मळणीची कामे सुरु आहेत. बाजरी पिक काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहे. मका व भुईमूग पिके पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत. भात पिक निसवणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. तूर पिक फुलोरा ते शेंगा लागणेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक काढणी व मळणीची कामे सुरु आहेत. कापूस पिक बोंडे धरणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफूल पिक दाणे भरणेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु झाली आहे. सप्टेंबर व ऑक्टोंबर मधील पावसामुळे शेत पिकांचे उत्पादकतेवर व गुणवत्तेवर परिणाम झाला असून, पिकांचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग -**

विभागात भात पिकावर निळे भुंगेरे या किडीचा व कडा करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी ज्वारी, हरभरा व मका पिकांच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. इतर पिकांच्या पेरणीसाठी पुर्वमशागतीची कामे सुरु आहेत. तसेच अहमदनगर, पुणे व सोलापूर जिल्हयात अनुक्रमे-७९५७६ हे., २२६४० हे. व ४६९९४ हे. असे एकूण-१४९२१० हे. क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झालेली आहे.

## कोल्हापूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.०३ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर ८.०८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.६२%) पेरणी झाली आहे. हळवे भात पिक पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत असून, काढणीस सुरुवात झाली आहे. निम गरवे व गरवे भात पिक दाणे भरणे ते दाणे पक्वतेच्या अवस्थेत आहे. नागली पिक फुटवे फुटण्याच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. लवकर पेरणी झालेले ज्वारी पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत तर उर्वरीत पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. मका पिक दाणे पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे. मूग, उडीद व घेवडा पिकांच्या काढणीची कामे पुर्णत्वाकडे आहेत. सोयाबीन, बाजरी व भुईमूग पिकांची काढणीची कामे सुरु आहेत. आडसाली ऊसाची लागणी पुर्ण झाली असून, पिक फुटवे ते वाढीच्या अवस्थेत आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पोषक पर्जन्यमान असल्याने ऊसाची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी भात पिकावर पिवळी खोडकिड व तुडतुडे या किडींचा, ऊस पिकावर हुमणी व लोकरी मावा या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकांच्या पेरण्या सुरु झाल्या असून, पावसामुळे रब्बी पेरणीची कामे थांबली आहेत. सातारा जिल्हयात १८१४२ हे. सांगली जिल्हयात ३२३७१ हे. तर कोल्हापूर जिल्हयात ४१४ हे. असे एकूण-५०९२७ हे. क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाली आहे.

## औरंगाबाद विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर २०.६३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०१.९७%) पेरणी झाली आहे. विभागात बाजरी पिक काढणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. मका पिक दाणे पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीची कामे सुरु आहेत. सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. उडीद व मूग पिकांची काढणीची व मळणीची कामे पुर्ण झाली आहेत. कापूस पिक बोंडे लागणे, बोंडे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी वेचणीची कामे सुरु झाली आहेत. भुईमूग पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. तूर पिक फुलोरा अवस्थेत आहे. विभागात अतिवृष्टी व पुरामुळे फळपिकांचे, शेतपिकांचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

## लातूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर २८.७३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०२.८१%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी पिक काढणीस सुरुवात झाली आहे. बाजरी पिके पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी कणसे काळी पडली आहेत. सोयाबीन पिक काढणीची कामे सुरु असून, पावसामुळे शेंगा काळया पडल्या आहेत. मका पिक काढणीची कामे पुर्ण झाली आहेत. मूग व उडीद पिकांची काढणीची कामे पुर्ण झाली आहेत. कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणीची कामे सुरु झाली आहेत. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. अतिवृष्टीमुळे शेत पिकांचे नुकसान झाले आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर घाटे अळी, पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

## अमरावती विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.२४ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर ३१.४५ लाख हेक्टर क्षेत्रावर (९७.५४%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस पिक फुले लागणे ते बोंडे धरणेच्या अवस्थेत तर काही ठिकाणी वेचणीची कामे सुरु आहेत. मूग व उडीद पिकांची काढणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. सोयाबीन पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून काढणीची कामे सुरु आहेत. तूर पिक वाढीच्या अवस्थेत आहे. सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकाच्या शेंगाना कोंब फुटत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळीचा, तूर पिकावर पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी हंगामाकरीता पुर्वमशागतीची कामे सुरु असून, अद्याप पेरणीस सुरुवात झाली नाही.

## नागपूर विभाग

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.१९ ऑक्टोंबर, २०२० अखेर १९.३९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.६६%) पेरणी झाली आहे. विभागात भात पिक फुटवे ते लोंबी अवस्थेत तर काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. कापूस पिक बोंडे धरणे, बोंडे उमलणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. मका पिक कणसे धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी काढणीस सुरुवात झाली आहे. तूर पिक फुलोरा ते शेंगा धरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक कणसे लागणे ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक शेंगा भरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीस सुरुवात झाली आहे. तीळ पिक फुलोरा ते बोंडे भरणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, भात पिकावर खोडकिड, मीजमाशी व तुडतुडे या किडींचा तर करपा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून आला.

## महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. १९.१०.२०२० अखेरचा अंतिम पिक पेरणी अहवाल

**क्षेत्र- हेक्टरमध्ये**

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.०४/११/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भात | १४९७४४९ | १५३९२८३ | १५४७३६४ | १०३ | १०१ | १ |
| २ | खरीप ज्वारी | ४८२४६१ | २८०८६० | २७५२१९ | ५७ | ९८ | -२ |
| ३ | बाजरी | ६७१५९५ | ६८२४९१ | ६३७०५७ | ९५ | ९३ | -७ |
| ४ | रागी | ९४७३१ | ७७१८९ | ७३८९५ | ७८ | ९६ | -४ |
| ५ | मका | ८३८०६० | ८८३६६७ | ९०७८०६ | १०८ | १०३ | ३ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६१ | ४०९८१ | ३६९६२ | ७० | ९० | -१० |
| **खरीप तृणधान्य** | | **३६३६९५६** | **३५०४४७१** | **३४७८३०४** | **९६** | **९९** | **-१** |
| ७ | तूर | १२७५९७१ | ११९५४९२ | १२३६१३२ | ९७ | १०३ | ३ |
| ८ | मुग | ४८३३४७ | ३३५९४२ | ४२९७१९ | ८९ | १२८ | २८ |
| ९ | उडिद | ३५८९५३ | ३०७९९५ | ३८९६५५ | १०९ | १२७ | २७ |
| १० | इतर कडधान्य | १००३२८ | ८८५२८ | १२३२६६ | १२३ | १३९ | ३९ |
| **एकुण कडधान्य** | | **२२१८५९९** | **१९२७९५७** | **२१७८७७२** | **९८** | **११३** | **१३** |
| **एकुण अन्नधान्य** | | **५८५५५५५** | **५४३२४२९** | **५६५७०७७** | **९७** | **१०४** | **४** |
| ११ | भुईमुग | १९८४३५ | १९३७६६ | २०४५५५ | १०३ | १०६ | ६ |
| १२ | तीळ | २३६७२ | ११०१८ | ९५२२ | ४० | ८६ | -१४ |
| १३ | कारळ | १९७२७ | ८४१९ | ७६०५ | ३९ | ९० | -१० |
| १४ | सुर्यफुल | १७९६५ | १३५१६ | १५२४७ | ८५ | ११३ | १३ |
| १५ | सोयाबीन | ३८८४६३३ | ४०३८१७३ | ४३५६५३० | ११२ | १०८ | ८ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८३६ | १०६३४ | १०२६९ | ७४ | ९७ | -३ |
| **एकुण तेलबिया** | | **४१५८२६८** | **४२७५५२६** | **४६०३७२७** | **१११** | **१०८** | **८** |
| **१७** | **कापूस** | **४१८३८०१** | **४४३०६१४** | **४२८६३३५** | **१०२** | **९७** | **-३** |
| **एकुण पेरणी क्षेत्र** | | **१४१९७६२४** | **१४१३८५६९** | **१४५४७१३९** | **१०२.४६** | **१०३** | **३** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **१२३०६९** | **२१६४०३** | **२३** | **१७६** | **७६** |
| **एकुण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३२८०३** | **१४२६१६३८** | **१४७६३५४२** | **९७.५६** | **१०४** | **४** |

टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत